REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2018


# चर्मकार समाजाच्या फुटवेअर व्यवसायाचे विश्लेषणात्मक अध्ययन

डॉ. पी. एस. चंगोले
सहयोगी प्राध्यापक व वाणिज्य विभाग प्रमुख, धनवटे नॅशनल कॉलेज, नागपूर.

**सारांश :**

भारतात अनेक जाती आहेत. त्या जातींना परंपरेने करावे लागणारे आपले व्यवसाय आहेत. चर्मकार समाज सुध्दा भारतातील जातीव्यवस्थेत सर्वात खालचा समजला जाणारा व्यावसायिक समाज घटक आहे. या समाजाला परंपरेने चर्मकारांचा व्यवसाय करणे बंधनकारक होते. त्यांना आपला व्यवसाय बदलता येत नव्हता. हजारों वर्षे पर्यंत याच व्यवसायात हा समाज राहिला. चर्मकार समाजाचे अस्तित्व संपूर्ण भारतातील प्रत्येक राज्यात असल्याचे स्पष्ट होते. चर्मकार समाज १९३५ च्या प्रथम भारतीय कायद्यानुसार अनुसूचित जातीत अंतर्भूत करण्यात आला. आज या समाजाला जातीचे प्रमाणपत्र सुध्दा मिळते. शिक्षणात समाधानकारक प्रगती करण्याची जिद्द या समाजाने दाखविली आहे. चर्मकार समाजात अनेक उपजाती आहेत. त्यांच्यात आजही आपसात विवाह संबंध क्वचितच होतात. जातींचे संस्कार प्रामुख्याने या समाजाच्या निरक्षर समुहात आजही पाहायला मिळतात. फुले — शाहू — आंबेडकरांच्या समाज परिवर्तनाच्या चळवळीचा प्रभाव ग्रामिण भागातील अस्पृश्य असलेल्या चर्मकार समाजावर सुध्दा झाला. त्यांनी जातीव्यवस्थेची उतरंड असलेले खेडे सोडून शहरात येण्याचा निर्धार केला.

भारतातल्या अनेक शहरात स्थलांतरीत झालेल्या फुटवेअरचा व्यवसाय करणाऱ्या चर्मकार समाजाच्या पार्श्वभूमिचा विचार केल्यास असे निदर्शनास येते की ग्रामिण भागात रोजगाराच्या संधी कमी—कमी होत गेल्यात. चर्मकार समाजाने आधुनिक गरजा लक्षात घेवून डॉ. बाबासाहेब आंबेडकाराच्या संदेशाप्रमाणे गावे सोडून शहरात येण्याचा निर्णय घेतला. किरायाने दुकाने घेतलीत. व्यवहार ज्ञान घेतले. संवाद कौशल्य विकसीत केले. कारखान्यात बनलेला माल (फुटवेअर) खरेदी केला व आपल्या दुकानातून विकण्यास सुरूवात केली. कमी श्रमात चांगली प्राप्ती होवू लागली. कुटुंबाचा उदरनिर्वाह समाधानकारक होण्यास मदत झाली. मुलांचे शिक्षण चांगल्या प्रकारे करण्याची संधी मिळाली. मुले चांगल्या वातावरणात वाढलीत आणि प्रगतीच्या वाटेवर मार्गक्रमण करू लागलीत. फुटवेअरचा व्यवसाय समाजात लोकप्रिय होवू लागला. गावातील अनेक कुटुंबे शहरात येवून आपला फुटवेअरचा व्यवसाय करू लागलीत. हे व्यवसायाचे बदललेले स्वरूप समाजाने मोठया आनंदाने स्वीकारले. आपली प्रगती यापध्दतीने सहजपणे होते यावर समाजाचे एकमत बनले. गावातील तिरस्कार आणि अपमान शहरात होत नाहीत हे त्यांनी अनुभवले. ते



सुखावले आणि गावक—यांना तसा संदेश दिला. परिवर्तनाला गती मिळाली. समाजाचा आत्मविश्वास वाढला. मुलांनी उच्च शिक्षित व्हावे असे प्रयत्न केले गेले. फुटवेअरचा व्यवसाय करणा—या चर्मकार समाजाची मुले उच्च पदावर पोचलीत. गाव सोडून शहरात आलेल्यांच्या जीवनात प्रकाश पडला. जीवनमान उंचावले. समाजात सम्मान वाढला.

**संकेत शब्द :** चर्मकार, फुटवेअर, व्यवसाय, जीवनमान, शिक्षण, आत्मविश्वास, परिवर्तन, परंपरा

**संशोधनाचा उद्देश :** १. गाव सोडण्याच्या कारणांची मिमांसा करणे.
२. फुटवेअर व्यवसायाची व्याप्ती व विकास अभ्यासणे.
३. बेरोजगारी समाप्त करण्यासाठी उपरोक्त व्यवसायाचे महत्व विशद करणे

## भारतातील चर्मकारांचा मुळ व्यवसाय व वर्तमान स्थिती

चर्मकार हा संस्कृत शब्द आहे. हिंदीत चमार, मराठीत चांभार असे म्हणतात. कातडी कमावणारे, कातडी काढणारे, कातडी वस्तू बनविणारे यांचा उत्तर भारतात चमार जातीत अंतर्भाव होतो. ऋग्वेदात कातडी कमावण्याचा उल्लेख आहे. शतपथ ब्राम्हणात कातडयाचा वस्त्र म्हणून उपयोग केल्याचा उल्लेख आहे. ऋग्वेदांमध्ये चर्म, चर्मन् यांचे उल्लेख येतात. कातडे ढोल, शिरस्त्राण, बाणाची मूठ इत्यादींसाठी वापरत असल्याचे महाभारतावरून आढळते. मनुस्मती, रामायण इत्यादी प्राचीन वाङ्मयात कामडी जोडयांचे उल्लेख येतात. (आचार्य गुरूप्रसाद, चमार वेदकालीन प्राचिन जाति, पृ. ८५)[१]

प्राचीन काळापासून शेतीची मशागत करणारे गावात राहात आणि गावकुसालगत खालच्या स्तरावरचे श्रमिक राहत असत असे आढळते. किळसवाण्या कामामुळे आणि राहणीमुळे हा खालचा वर्ग अस्पृश्य मानला गेला असावा असा काहींचा मतप्रवाह आहे. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर या मताचे खंडन करतात. ते म्हणतात, 'भारतात जेवढे अस्पृश्य आहेत ते पुर्वाश्रमीचे बौध्द होते. बुध्द विरोधकांनी राजसत्तेच्या मदतीने यांना सामाजिक आणि शैक्षणिक समानता नाकारली आणि आर्थिक परावलंबी बनवून लाचार केले. तसेच गावाच्या शेवटच्या टोकावर वस्ती करण्यास बाध्य केले. (कासारे एम. एल., पृ. ७६)[२] (In fact the tanning sections of the Chamars, of whom the Chamar is one, seem to accupy the lowest level wherever they are pound) आर्य जेते असल्याने त्यांनी आपल्याकडे धार्मिक व लष्करी कामे ठेवली. हळूहळू धर्मगुरू आणि सरदार जमीनदार बनत गेले. दासस्यू हे अतिशय दडपलेले, बहिष्कृत ठरले गेले. गावातील सर्वसाधारण समाज आणि हा गावकुसाबाहेरचा दलितवर्ग (दस्यू) यांत स्पष्ट भेदरेखा होती. ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र अशी असमानतेवर आधारलेली वर्णव्यवस्था आर्यांनी बनवून समाजाचे विभाजन केले.(कीर धनंजय, राजर्षी शाहू छत्रपती, पृ. १८९)[३]

**चमार अनार्य होते.** (अनु. कर्दम जयप्रकाश, चमार, पृ. १४)[४] **चमारांमध्ये अनेक उपजाती आहेत. अझमगडिया, बानौधिया, अहरवार, झुसिया, गंगापारी, गोरखपूर जिल्हयात चारशे वर्षापूवी चमार नव्हते.** उच्च वर्गातून अनेक या जातीत आल्याचे दिसते. याचे कारण स्त्रियांचे उच्चवर्णियांशी विवाहबाहय संबंध आले असावेत. शिक्षा, दडपण इत्यादींमुळे जाटासारख्या काही पोटजाती या जमातीत आल्या असाव्यात. **काही जाटिया आपण जाटाचे वंशज असल्याचे सांगतात.** कनौजिया, चौहान, सक्सेना, बुंदेला इत्यादी नावे मूळ राजपूत कुलाची आहेत. जाटियामध्ये वांशिक सरमिसळ झालेली असावी. डोम, कंजार, हबुरा, कोळ अशा जातींतूनही चमारजातीत भर पडली असावी. राजकीय दबावामुळे काही जमाती खाली चमारजातीत लोटल्या गेल्या. पर्यावरण व अन्न यांमुळे चमारांच्या शारीरिक ठेवणीत, रूपात फरक पडला असावा. चमार जमात फार प्राचीन काळापासून भारतीय जीवनाशी जवळीक साधून जगत आलेली आहे.
(Chamars, including Mochis, are scattered all over the 'Aryo-Dravidion' tract and leather workers under one name or another are found in nearly every part of India G. W. Briggs, the Chamar, 1920 P. 20) अस्पृश्य असलेले व नसलेले, गाईचे मांस खाणारे, न खाणारे असे चामारांत प्रकार आहेत. चमारांची वस्ती गावाबाहेर असते. त्यांची राहणी अस्वच्छ व दयनीय असते. चमार हे नावच मुळी जनावरांच्या प्रेताशी निगडीत असते! चमार कातडे सोलून काढतो. एवढेच नव्हे तर जनावरांचे मांस खातो. कातडी कामात नसलेला चमार जातीतला भागही अस्पृश्य मानला जातो. **भारतातील समस्त चर्मकार पुर्वाश्रमीचे बौध्द होते असे आचार्य रजनीश म्हणाले.** (आचार्य रजनीश, संत रोहिदास, पृ. ३८)[५]

मोची जातीचा अंतर्भाव असलेली चमार जात भारतभर आहे. उत्तरप्रदेश, बिहारचा पूर्व भाग आणि पंजाबचा वायव्य भाग यामध्ये जास्त प्रमाणात आहे. **उत्तरप्रदेशात मुसलमानांप्रमाणेच चमार जात मोठया**

**प्रमाणात आहे. १८९१ च्या जनगणनेत चर्मकारांच्या जातीत सुमारे ११५६ उपजाती आढळल्या होत्या. खरे तर मुख्य अशा सात उपजाती आहेत. मात्र त्यांची नावे आणि मानमान्यता भिन्न ठिकाणी भिन्न आहेत. उत्तरप्रदेशात जाटिया आणि जयस्वार हया दोन प्रमुख पोटजाती आहेत.**

चामचमार, दोहर, कुरिल, पूर्बिया, कोरी किंवा कोली चमार, अहरवार, धुसिया (झुसिया), चमेकाटिया, दोसाध (दुसाध), अझमगढिया, कैयान इत्यादी महत्वाच्या पोटजाती होत. रंगिया ही काही पोटजात नव्हे तर ते व्यवसायावरून पडलेले नाव आहे. रायदासी हीही पोटजात नव्हे. अलखगरी ही एक स्वतंत्र पोटजात नव्हे. छत्तीसगड येथील सतनामी हया पोटजातीने कातडीकामे पूर्णपणे सोडून शेती करण्यास प्रारंभ केलेला आहे.

अलखगीर ही एक स्वतंत्र पोटजात झाली आहे. मंगतिया ही भीक मागणारी पोटजात आहे. **गवंडीकाम करणारी राज किंवा राजमिस्त्री पोटजात अलीकडेच निर्माण झालेली आहे.** चैन ही गुन्हेगार पोटजमात समजली जाते. **चाण्डार ही पोटजात श्रेष्ठ समजली जाते.** रामदासी जमात विणकर आहे. बिहार—बंगालमध्ये मोची आणि चौर हे निम्न स्तरातले समजले जातात. मराठी चमार आणि कल्प अशाही पोटजाती आहेत. तो तामिळमध्ये कातडीकाम करणारे चकललियान आहेत. तर तेलगु मादिगा ही जमात तेच काम करते. मादिगांमध्ये बरेच जण शेतमजूर असतात. **त्यातले १० टक्के लोक १९०२ मध्ये खिश्चन झाले.** चमार—जुलाहा, कोरी—चमार अशी नावे इतर जातीजमातींच्या संबंधाकडे निर्देश करतात.

कायस्थ—मोचीच्या मते मोची हे नाव व्यवसायदर्शक आहे. **जुलाहा ही जात मुस्लिम विणकरांची आहे. ती चमारापासूनच निर्माण झाली.** विणकामामुळे हया जातीने वरचे स्थान मिळवले. **हिंदू जुलाहामध्ये कबीरपंथी आणि रामदासी आहेत. कबीर हा चर्मकार जुलाहा होता.** (डॉ. मुंशीलाल गौतम, पृ.१८१)[६] मोची ही व्यवसायामुळे चमार जातीपासून वेगळी निघालेली जमात आहे. **१८९१ मध्ये मोची जमातीत दीडशे पोटजाती होत्या.** मोची चमारापेक्षा श्रेष्ठ असतात आणि ते आर्थिकदृष्टयाही चांगले असतात. काही मोची मुस्लिम असतात. काही मोची कातडी कमावतात. काही विणकाम करतात, काही हिंदू मोची कातडी वस्तू बनवतात, जोडे बनवत नाहीत.

## फुटवेअरचा व्यवसाय करणारा महाराष्ट्रातील चर्मकार (चांभार)

सन १९३१ च्या जनगणनेनुसार नागपूर जिल्हयात १०,०५३ (५,०७४) पुरूष व ४,९७९ महिला) चांभार होते. **महाराष्ट्रात चर्मकारांच्या ३५ पोटजाती आहेत.**(राजेंद्र प्रसाद, पृ. ४३२)[७]

चामडयाच्या वस्तू व पादत्राणे बनवणारी ही एक जात. या लोकांना मोची, चमार अशीही नावे आहेत. चर्मकार या संस्कृत शब्दापासून चमार, चांभार हे शब्द आले आहेत. जिल्हयात चांभारांचे डोहर व चांभार असे दोन पोटभेद आढळतात. डोहरांना चांभारापेक्षा कमी लेखतात. डोहर मेलेल्या गुरांचे कातडे फाडून कमावण्याचे काम करतात तर चांभार कातडयाच्या वस्तू व पादत्राणे बनवितात. शहरांमध्ये उत्तर भारतातील मोचीही आढळतात.

## चर्मकारांची (चांभारांची) सर्व समाजात आढळणारी आडनावे

गिरडकर, चांदेकर, विजयकर, कलालकर, हांडे, व्यवहारे, घोडे, वाडेकर, काकडे, ठाकरे, भागवते, ठोंबरे, खेडके, नाफेकर, लांडगे, कुरील, भगत, दांडेकर, चंगोले, इंगळे, काटोले, मोहोकर, काकडे, इंगोले, वानखेडे, माठे, मानेकर, गुलाबे, बसेशंकर, हनोते, गायकवाड, महाजन, रंदये, दायदार, पेलने, मालखेडे, भटकर, अवसरे, खोडे, नाचने, वनस्कर, गवई, पिंजरकर, शिंगाडे, बोडखे, डाखोरे, पिंपळकर, पोरडकर इत्यादी. चांभार व डोहर अंतर्विवाह गट असून ते सगोत्र व समान देवकात विवाह करीत नाहीत. लग्न मंडपात एक खांब उभारतात. त्याच्या भोवती सात फेरे घालणे हा लग्नातील मुख्य विधी असतो. इतर सर्व विधी हिंदू पध्दतीप्रमाणेच केले जातात. मूल जन्माला आल्यावर महिला सोहर (सुहेर) गीते गातात. नवजात मुलाला भुताखेताची बाधा होऊ नये म्हणून तवा वाजवून आवाज करतात. बाराव्या दिवशी नामकरण विधी करतात. हे लोक मृतांना पुरतात किंवा जाळतात व श्राध्द करतात. दहाव्या दिवशी ज्ञातिभोजन असते. प्रामुख्याने नागपंचमी, दिवाळी व होळी हे सण चांभार पाळतात. गोवर्धन दिवाळी नावाचा आणखी एक

सण असतो. त्या दिवशी गोमयाची कृष्णप्रतिमा करून बाल गोपाळांना जेवणही घालतात. **चांभारांमध्ये कबीर पंथीय व नानक पंथीय असून काही सतनामी पंथाचे अनुयायी आहेत.** शिवाय ते अनेक साधू व वैराग्यांना भजतात. शिव, भैरव, गणपती व हनुमान या दैवतांनाही हे लोक भजतात. हे लोक अंधश्रध्दाळू असून त्यांच्यात भूतपूजा प्रचलित आहे. दगड—धोंडे, वृक्ष—वेली व पशु—पक्षी यांच्यात भुतेखेते वास करतात अशा समजुतीने हे लोक त्यांची पूजा करतात. **काही चांभार नागपूजक आहेत.**

## नागपूर जिल्हयातील चर्मोद्योग

फुटवेअर (पादत्राण) बनविण्याचा उद्योग नागपूर जिल्हयातील सर्व शहरात आणि खेडयातून आढळतो. या जिल्हयात हातमागाच्या खालोखाल चर्मोद्योगाला स्थान होते. जिल्हयात चामडयापासून बूट, चप्पल किंवा सँडल, कातडी पिशव्या, चामडयाचे दोर, पखाली, मोट, बैलाच्या गळयातील पटे व इतर किरकोळ वस्तू बनविल्या जात असत. हा वंशपरंपरागत उद्योग करणा—यांना चांभार किंवा मोची असे संबोधले जाते. १८९१ च्या जनगणनेनुसार जिल्हयात बुट, सँडल्स् चप्पल इत्यादी वस्तू बनविणा—या कारागिरांची संख्या ५,३७४ होती. १९३१ च्या जनगणनेनुसार जिल्हयात १०,०५३ चांभार होते. १९६१ च्या जनगणना अहवालानुसार जिल्हयात पादत्राणे तयार करणे व ते दुरूस्ती करणारे १४,७४० कामगार होते. या उद्योगाची मुख्य केंद्रे नागपूर, उमरेड, कामठी, कन्हान, खापा, काटोल, कळमेश्वर आणि नरखेड येथे होती. या जनगणना अहवालानुसार जिल्हयातील चांभार आणि जोडे दुरूस्ती करणाऱ्या कारागिरांचे एकूण लोकसंख्येच्या दर लक्ष माणसांमागे प्रमाण १७४ होते. कानपूर, लखनौ, कलकत्ता आणि चेन्नई (तेव्हाचे मद्रास) येथे चामडे कमावण्याचे मोठे उद्योग सुरू झाल्यामुळे मशीनवर बनविल्या जाणा—या अधिक दर्जेदार उत्पादनाच्या स्पर्धेमुळे गावोगाव चालणारा हा उद्योग बसला. इ.स. २०००—२००१ मध्ये ११८ घटकातील १७८ कारागिर मजुरांनी ५०.७८ लाख रूपयांचे चामडयाच्या वस्तूंचे उत्पादन केले व त्याना १७.५८ लाख रूपये मजूरी मिळाली व त्यांच्या उत्पादनाची विकी किंमत ७१.३५ लाख रूपये होती (महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, नागपूर जिल्हा भाग १, पृ. ५७७)८

## चर्मकार समाज : जातिव्यवस्थेचा बळी, अपमानामुळे गावे सोडली

चर्मकार समाज अति प्राचीन काळापासून भारतात निवास करतो. अस्पृश्य समाज घटक म्हणून त्याची निवासस्थाने गावाच्या एका कडेला असायची. **चर्मकलेत तज्ञ असलेला हा समाज स्वावलंबी व स्वाभिमानी वृत्तीचा असल्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले आहे.** (जिज्ञासू चंद्रिकाप्रसाद, भारतीय चर्मकारों व महारों की उत्पत्ति, स्थिति और जनसंख्या, पृ. २९)[१२] स्वातंत्र्योत्तर काळात या समाजाने गावे सोडायला सुरूवात केली. जाती कोणी, कधी, का निर्माण केल्यात यासंबंधी अनेक अभ्यासकांनी आपली मते मांडली आहेत. जातीव्यवस्थेचा फटका या देशातील १५०० जातींना बसला व त्यांना जनावरापेक्षाही हीन वागणूक देण्यात आली असे इतिहास सांगतो.

## चर्मकारांच्या फुटवेअर व्यवसायाची पार्श्वभूमी

भारतातील प्रत्येक समाजाची वैशिष्टये त्या त्या समाजाच्या बोलीभाषेतील म्हणी, वाक्प्रचार यांतून दिसून येतात. त्यानुसार चांभार समाजाचे विशिष्ट गुण मराठी भाषेतील काही प्रचलित वाक्प्रचारांवरून दिसून येतात. **'चांभाराच्या देवाला खेटरांची पूजा'** ही म्हण तर सर्वश्रुत आहेच. त्याशिवाय जातींवरून काही वाक्प्रचार पडलेले आहेत ते म्हणजे 'चांभारी गोचीड' (अतिशय लोचट व्यक्ती) (गौतम, २००७, पृ. १०३)[९] **'चांभारचौकशी'** (सूक्ष्म परीक्षा, नसती उठाठेव) 'चांभारी' (गुरांच्या अंगावर उमटेला माराचा वळ), चांभार चुका (चपलांसाठी वापरले जाणारे लहान खिळे).

चांभार समाजाची एकंदर समाजातील प्रतिमा काहीही असली तरी जोपर्यंत ग्रामीण महाराष्ट्रात बलुतेदारी पध्दत चांगली मूळ धरून होती तोपर्यंत चांभार हा पहिल्या ओळीतला बलुतेदार म्हणून गणला जात असे.(बोखारे नरेंद्र, १९९९, पृ. ९)[१०] परंतु शेतीविषयक तंत्रज्ञानात जसजशा सुधारणा होत गेल्या तसतशी चांभारांच्या बलुतेविषयक सेवेची गरज कमी कमी होऊ लागली. सुरूवातीला कातडी मोटा

वापरातून जाऊन लोखंडी मोटारी आल्या. त्यानंतर तेलावर चालणारी इंजिने व विजेवर चालणा—या मोटारी विहिरीवर बसवल्या जाऊ लागल्या. त्यामुळे चांभारांचे पारंपारिक काम बरेच कमी झाले. तसेच, बैलांचाही शेतीकामातील वापर काही प्रमाणात कमी झाल्यामुळे शेतकामासाठी तरी चांभारांची फारशी गरज उरली नाही.

गेल्या साठ वर्षांत फुटवेअरच्या (पादत्राणांच्या) बाजारपेठा मोठया कंपन्यांनी व्यापल्यामुळे चांभारांच्या कसबाला दुरूस्तीपलीकडे फारसा वाव राहिला नाही. चांभारांनीसुध्दा पारंपारिक कसब न सोडता नवीन कसब शिकण्याचा प्रयत्न चालवलेला आहे. **रस्त्याच्या कडेला बसून चप्पल दुरूस्ती करणाऱ्या चांभारास गटई असे म्हणतात.** केवळ दुरूस्तीमध्ये काही कौशल्य दाखवणे चांभारांना शक्य झाले नाही. शिवाय, चपलांसाठी जे परंपरागत माध्यम म्हणजे चामडे वापरले जात असे त्यातही बदल होऊन प्लॅस्टिक, ॲक्रिलीक अशांसारखे नवीन मटेरीअल वापरले जाऊ लागले. त्यामुळे उत्पादन कमी खर्चात करता आले.

खेडेगावात वलुत्याची प्रथा बंद झाल्याने खेडयातले बरेचसे चांभार शहरांमध्ये वस्ती करू लागले. शहरांमध्ये पारंपारिक धंद्याव्यतिरिक्त इतर उद्योगधंदे करण्याची सोय असल्याने पारंपारिक कसब वाढवण्याकडे फारसे कुणाचे लक्ष राहिले नाही. पूर्वी चांभार/चर्मकार समाज इतर बलुतेदारांच्या मानाने बऱ्यापैकी सधन होता. नागपूर, औरंगाबाद, कोल्हापूर, मुंबई, पुणे व इतर शहरांत चांभारांची बरीच दुकाने असत, परंतु आता चपला—बूट तयार करणाऱ्या कंपन्यांनी बहुतेक दुकाने व्यापली असून चांभारांची दुकाने तुलनेने कमी दिसतात.

आरक्षणामुळे चांभार समाजात सुशिक्षितांचे प्रमाण वाढत आहे. शहरी भागांत जे चांभार शिकून नोकऱ्या करतात त्यांच्यात व इतर जातींमध्ये फरक करणे कठीण आहे. विशेषत: लग्नपध्दतीत व मूल जन्मण्याच्या वेळच्या विधींमध्ये महाराष्ट्रीय समाजाच्या रीतीभाती बऱ्याच चांभारांनी अनुसरलेल्या आहेत. सुशिक्षित व शहरी भागांतील चांभारांमध्ये सध्या बहुजन समाजात अस्तित्वात असलेली लग्नपध्दती वापरली जाते. त्याचप्रमाणे, कायद्यांमधील विविध तरतुदींनुसार बालविवाह, विधवाविवाह, घटस्फोट, जातपंचायतीच वर्चस्व यासंबंधित नियमदेखील बदलत्या काळानुसार बदलत आहेत. मागासवर्गीयांना आरक्षणाचा व सवलतींचा लाभ मिळत असल्यामुळे शिक्षणाचा प्रसार होऊन चांभारसमाज आपली प्रगती करण्यास अग्रेसर होत आहे. (भोसले बी. व्ही., २००३, पृ. ६३)[११]

## ग्रामिण आर्थिक जीवनात चर्मकारांची भूमिका

गावखेडयात बलुतेदारांची व्यवस्था गावोगावी होती तोपर्यंत चांभार हाही एक बलुतेदार असल्याने चपला बांधणे ही त्याची सामाजिक जबाबदारी होती; पण काळ बदलला आणि समाजात परिवर्तनाचे वारे वाहू लागले. महात्मा जोतीराव फुले यांची समाज परिवर्तनाची चळवळ गतिमान झाली तसे महाराष्ट्रातील निम्न समाज घटक समतेच्या विचारांनी भारावून गेले. (कीर धनंजय, २०००, पृ. ५३)[१२] गावगाडयातील सामाजिक बांधिलकीचे सांस्कृतिक नाते संपले आणि उत्पादक, विक्रेता व खरेदीदार गिऱ्हाईकाचे अर्थाधिष्ठित वर्गीय व्यवहारी नाते निर्माण झाले. या नव्या नात्यात बांधिलकी, कर्तव्य, जिव्हाळा यांना फाटा मिळाला व नवसंकल्पनेला सुसंगत असा अर्थसंबंध तेवढा शिल्लक राहिला. परंतु जोपर्यंत उत्पादकाचा मध्यस्थाशिवाय उपभोक्त्याशी थेट संबंध होता, नफातोटा याच्याशी सांगड नव्हती तोपर्यंत देवाणघेवाण व्यवहारात जो प्रमाणिकपणा व सचोटी होती ती व्यापार या निखालस अर्थाधारी व्यवहारी वर्ग संकल्पनेपेक्षा माणुसकीच्या नात्याने अधिक चांगली होती असे खात्रीपुर्वक वाटते. आज ज्या सामाजिक बांधिलकीचा आपण उल्लेख करतो ती वर्गहीन समाजरचनेत नैसर्गिकपणे जोपासली जाई. देवाणघेवाणीचा जो काही व्यवहार चालायचा तो दहापाच मैल, काही कोसांच्या भूगोल त्रिज्येत मर्यादित असायचा. त्यामुळे लांडीलबाडी, फसवाफसवीला वावच नसे. उलट, उपभोक्त्याला आपण चांगला माल दिला याचा आनंद व समाधान पैशातील मोबदल्यापेक्षा अधिक मोलाचे वाटावेत असे ते दिवस होते.. **चर्मकारांच्या सोज्वळ, पवित्र, निष्कपट वर्तनात जो आनंद समाजाला मिळाला त्याचे श्रेय गुरू रविदासांच्या विचारधारेला जाते.** (कुमार कुलदीप, २००९, पृ. १७२)[१३]

वर्तमानात फुटवेअर व्यवसाय ज्या पध्दतीने भरभराटीस आलेला दिसतो तशी स्थिती विसाव्या शतकातील पहिली चार दशके उलटली तरी नव्हती. ठराविक नमुन्यातील मोजक्या चपला चांभार बनवत. नमुन्यातील विविधतेपेक्षा, मजबुतीला प्राधान्य देण्याकडे उत्पादक व गिऱ्हाईक यांचा कल असे. दिखाऊपणाला आज आलेले महत्व त्या काळात टिकाऊपणाला होते. जोडे—चपला वापरणे हा जणू पुरूषांचाच अधिकार असावा. **स्त्रिया व मुले सहसा अनवाणी असत.** अल्प प्रमाणात गर्भश्रीमंतांची मुले व स्त्रिया चपला वापरताना दिसत. **स्त्रियांनी पायात काही वापरणे ही गोष्ट सामाजिक रूढीविरूद्ध व खानदानी मर्यादेचे उल्लंघन मानले जाई.**(साळुंखे आ. ह., २०००, पृ. ९९)[१४] ही समजूत विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातही काही भागात रूढ आहे. स्त्रियांनी सायकल, मोटार यासारखे वाहन चालविणे हा जसा कुतूहलाचा, उपहासाचा व चर्चेचा विषय सुरूवातीच्या काळात होता, तसाच स्त्रियांनी चपला वापरणे हा टीकेचा विषय होता. याला कोणत्याही वर्ण/जातीची स्त्री अपवाद नव्हती. ज्या स्त्रियांनी या रूढीविरूद्ध वागण्याचे धाडस करून चर्चा, उपहास, अपमान सहन करून ही प्रथा मोडली त्यांचे हार्दिक अभिनंदन. प्रतिष्ठेच्या, खानदानी इभ्रतीच्या, रूढीप्रियतेच्या तर्कविसंगत खोटया कल्पनांनी समाजमनात कसे घर केले होते त्याचेच हे उदाहरण आहे. शेतीवाडीत काम करणाऱ्या कामकरी स्त्रिया याला अपवाद होत्या. त्या विशिष्ट नमुन्याची चपली नावाची वहाण वापरत. आजकाल ही चप्पल पाहावयास मिळणेही कठीण आहे. मागणीप्रमाणे व्यक्तिगत पायाचे माप घेऊन त्याप्रमाणे वहाण बनवायची, त्यामुळे ती पायात व्यवस्थित बसण्याचा फारसा प्रश्न नसे. चांभाराचे राहते घरी हेच त्याचे दुकान असे. (पातकर मधुकर, १९९९ पृ ५४)[१५]

अशी समजूत आहे की, दर पंचक्रोशीला भाषेचा ढंग बदलतो. शब्द तेच, भाषा तीच पण उच्चारभिन्नतेमुळे ती वेगळी वाटू लागते. पायताणाला अंगठा, वाद, धुरीवरील पटी या गोष्टी समान असतात हे स्वाभाविक आहे, याचे कारण पायाचा आकार! यामुळे वहाणांची पायाभूत जडण—घडण समान राहिली तरी त्याच्या कक्षेत राहून कापणी—जोडणीत, आकार—प्रकारांत कारागिराच्या कल्पनेचा, हस्तकौशल्याचा सहजाविष्कार होणे स्वाभाविक आहे. यातूनच काही वेगवेगळया आविष्कारांच्या नमुन्यांची निर्मिती होऊन त्या ती विशिष्ट नावाने प्रसिद्ध पावली. कोल्हापुरी, पुडाकापशी, कुरंदवाडी, अधणी, धनगरी हे वाण याचेच उदाहरण आहे.

### जगप्रसिध्द कोल्हापुरी चप्पल : जागतिक बाजारपेठेत

आज देशविदेशांतील बाजारपेठेत नावलौकिक प्राप्त केलेल्या, कोल्हापुरी म्हणून प्रसिध्दी पावलेल्या, चपला कोल्हापूरच्या चर्मकारांचे फार मोठे संशोधन आहे. या भागात ही चप्पल प्रसिध्द होण्याला कोल्हापूरची भौगोलिक, राजकीय, ऐतिहासिक परिस्थिती कारणीभूत आहे. चारी दिशांना जोडणारे व्यापारी केंद्र असे भौगोलिक स्थान प्राचीन काळापासून निसर्गत: कोल्हापूरला लाभलेले आहे. दक्षिण काशी असे धार्मिक महत्व आहे. ताराराणीने या शहराला एका स्वतंत्र राज्याचा दर्जा दिला. इंग्रजी राजवटीत ऐन स्वातंत्र्यलढयाच्या महत्वाच्या काळात शाहूराजांची कारकीर्द कोल्हापूराने पहिली आहे. (सुर्यवंशी, कृ.गो. १९८४ पृ. ९१)[१६]

ऐतिहासिक काळापासून संघराज्यात सामील होईपर्यंत कोल्हापूरला संस्थानिक राजपरंपरा असल्याने सैनिकपरंपरा पण होती. या दोन्ही परंपरांत अनेक कामांत हरतऱ्हेच्या चर्मवस्तूंची गरज असे व जिथे ज्या वस्तूंची मागणी असते तिथे ती पुरी करणारे कारागीर व व्यापारी यांचे केंद्र स्वाभाविक बनते. कारागिरांना भरपूर काम व प्रोत्साहन मिळते व हस्तकौशल्य वाढविण्याची संधीपण मिळते. राजवैभव ही गोष्ट आता इतिहासाच्या पानांत बंदिस्त झालेली आहे. या राजवैभवात असंख्य गरजेच्या तशा अलंकारीक वस्तूंचा समावेश असे. या राजांचे सैन्यदल म्हटले म्हणजे पायदळ, घोडदळ, हत्तीखाना हे विभाग आलेच! प्राणीसंग्रहातही वाघ—सिंहापासून कुत्री—मांजरापर्यंत सर्व काही असे. तसेच घोडागाडी हे फिरण्याचे मुख्य साधन असल्याने आज जशा वेगवेगळया आकाराच्या मोटारी असतात तशा घोडागाडया असत. या घोडागाडया मोठया दिमाखदार असत. सरदार, जहागीरदार व ज्येष्ठ अधिकारी यांचे दरबार भरत. शाही थाटाच्या मिरवणुका निघत. यासाठी गणवेश, पेहराव, अलंकार असत व हे सर्व करणारे दर्जी, पगडबंद,

विणकर, सोनार, सुतार, लोहार इत्यादी कारागीर वतनदार नोकर असत. यामध्ये चर्मकारांचाही समावेश असे. जनावरांचे लगाम, डोळयांवरील झापडे, डोकीवरील तुरे, अनेक तऱ्हेचे खोगीर, रिकीबी, पट्टे, वहाणा/चपला, चढाव, म्याने, चाबूक, गणवेशासाठीचे कमरपट्टे व गळपट्टे एक ना अनेक चर्मवस्तू लागत. त्या बनवणारे कुशल चांभार व त्यासाठी उत्तम कमावलेले चामडे आवश्यक होते. यातून कोल्हापुरी चप्पल विकसित झाली व ती सर्वदूर लोकप्रिय झाली. खिळामोळ न वापरता चामडयाच्या उत्तम चपला बनवण्यात कोलपूरातील जन्मजात चर्मकारांनी जी कुशलता मिळविली आहे तशी इतरत्र अभावाने आढळायची, किंवा आजही आढळते. परंतु आज जगभर पादत्राणे निर्यातीचा मोठा व्यापार करणाऱ्या कानपूरने कोल्हापूर धाटणीच्या चपला बनवून देशी—विदेशी मोठी बाजारपेठ काबीज केली आहे. कोल्हापूरातून चपला निर्यातीचा प्रयत्न काहींनी करून पाहिला, पण सचोटी व मोठया व्यापारातील पथ्ये व पत यांच्या जाणिवेअभावी हे प्रयत्न अयशस्वी झाले. आजही कोल्हापुरी चपलांना देशविदेशात चांगली मागणी असूनही ती पुरी करणारी यंत्रणा कोल्हापूरात नाही ही वस्तुस्थिती आहे. जो काही कोल्हापुरी चपलांचा व्यापार चालतो, तसा तो मर्यादित स्वरूपात मर्यादित बाजापेठेशीच चालतो. याच्या अनेक कारणापैकी कारागिरीतील बेभरवशाची लबाडवृत्ती व व्यसनाधीनता ही प्रमुख आहे. परंपरेने पादत्राणांचा व्यवसाय करणारा चांभार कारागीर सामान्यत: आर्थिक ओढग्रस्तीच दयनीय जीवन जगताना दिसतो. त्याचा धंदा, त्यांचे अज्ञान, स्थितिप्रियता का व्यसनाधीनता? हा अभ्यास पाहणीचा विषय ठरेल. कारागिरांच्या तुलनेने त्यांच्याकडून माल घेऊन व्यापार करणारा दुकानदार बरे जीवन जगत असतो. वंशपरंपरेने व्यापार करणारा चर्मकार आधुनिक क्रयविक्रयशास्त्राशी परिचित नसला, तरी आपल्या मालाचा उठाव करण्यासाठी लागणारी बोलण्याची कला त्याला चांगली अवगत असते.(शर्मा सतिश, १९८६, पृ. ४५)[१७]

कोल्हापुरी चपला तयार करण्याचे काम कोल्हापूर प्रमाणे मिरज, सांगली, कर्नाटकातील ऐनापूर, कुडची, शेडबाळ, शेवगाव, निपाणी, समडोळी, चिकोडी, संकेश्वर, कागवड, अथणी वगैरे गावांतूनही चालते.

## वंशपरंपरेने व्यवसाय करणे मनुस्मृतीनुसार बंधनकारक

भारतातील हजारो जातींना आपल्या जातीला नेमून दिलेला व्यवसाय करणे मनुस्मृतीने बंधनकारक केले होते.(डॉ. साळुंखे आ. ह., मनुस्मृतीच्या समर्थकांची संस्कृती, पृ.१)[१८] चर्मकारांना सुध्दा या बंधनात राहूनच आपला व्यवसाय करावा लागला. आज भारतीय संविधानामुळे सर्व समाज घटकांना आपल्या आवडीनुसार व्यवसाय निवडीचे स्वातंत्र्य् बहाल करण्यात आले आहे. जगाच्या पाठीवर कोणत्याही समाजरचनेत वंशपरंपरेने एकच एक व्यवसाय करणाऱ्या गटांचा त्या त्या व्यवसायापुरता एक वर्ग तयार होतो व त्याचे रूपांतर कालांतराने विशिष्ट जातीत होते. पादत्राणे तयार करणाऱ्या अशा वंशपरंपरागत कारागिरांना चर्मकार हा संस्कृत शब्द आहे. याच मूळ शब्दापासून चांभार, चमार हे भाषेतील उच्चारामुळे शब्द प्रचारात आले. **'ज्ञानकोश' कार कै. श्री. व्य. केतकर यांच्या मताप्रमाणे बिहार व पूर्वीचा संयुक्त प्रांत हे प्रदेश चर्मकारांचे मूळ स्थान होय. व्यवसायानिमित्त हे चर्मकार सर्व भारतभर विखुरले गेले.**(पातकर मधुकर, १९९९, पृ. १७)[१९]

चर्मकार जातीबद्दल लिहिताना आपल्या ज्ञानकोशात ते पुढे म्हणतात, 'चर्मकारामध्येही देवदेवतांची चाल व गोत्रे आहेत. विवाहात सप्तपदीचा संस्कार आहे. जोवर जोडयावर धाग्यांनी कशिदा करता येत नाही, तोवर विवाहाच्या दृष्टीने मुलींचे वैगुण्य मानीत, चांभार स्त्री—पुरूष शरीरयष्टीने लहान सरणीचे पण चेहरेपट्टीने देखणे असतात. संस्कृत साहित्यात श्रृंगार नायिकेचे वर्णन आहे, त्या वर्णनाप्रमाणे पद्मिनी वर्गातील स्त्रिया चांभार समाजात आढळतात. चांभार स्त्रिया पादत्राणे तयार करण्याच्या कामात पुरूषांना मदत करतात. जुन्या जमान्यात चांभार स्त्रिया सुईणीचा व्यवसाय करीत.'

## फुटवेअरचा व्यवसाय करणारे चर्मकार समाजातील थोर पुरूष

या समाजात रोहिदास/रविदास/रैदास/रूईदास नावाचा श्रेष्ठ संत (१३७७—१५२८) मध्ययुगीन काळात वाराणसी (उप्र) येथे होऊन गेला. (कुमार उमेश, २०००, पृ. ४२)[२०] तसेच तामिलनाडू येथे संत नंदनार, कर्नाटकात संत हराळे, काशी (उप्र) येथे संत कबीर आणि मध्यप्रदेशात/छत्तीसगड येथे संत घासीदास हे थोर महापुरूष होऊन गेलेत. त्यांची व्यावसायीक व सामाजिक शिकवण आजही चर्मकार समाजाने अंगिकारली असल्याचे दिसते.(चंगोले पी. एस. गुरू रविदास, पृ.२३)[२१] उत्पादन व विक्री याचे ज्ञान व गुण जसे जन्मजात आलेले दिसतात, तसेच त्यांच्या अंगी मुरलेला आळस व व्यसनाधिनता त्यांच्या उन्नतीमधील अडसर आहेत. कुटुंबातील लहानथोर सर्व घटक कमाई करत असूनही त्यांचे राहणीमान उंचावत नाही, याला कारण हे स्वभावदोष व व्यसनाधीनता आहे, व्यसनाचा व आळसाचा आपल्या धंद्यावर अनिष्ट परिणाम होतो याकडे ते पूर्ण उदासीनतेने पाहातात. याला जे अपवाद आहेत त्यांचे राहणीमान व आर्थिक स्थिती व शिक्षण याबाबतीत ते सुधारलेल्या वर्गात शोभतील असे आहेत. (बागडे रविन्द्र, १९९९, पृ. ७७)[२२]

## यांत्रिक शोधांमुळे फुटवेअरच्या विश्वात झालेले परिवर्तन

निसर्गाने बहाल केलेल्या सौंदर्याला उत्तम वस्त्रप्रावणांनी अधिक देखणे करणे ही माणसाची नैसर्गिक प्रवृत्ती आहे. या वस्त्रप्रावरणात शिरोभूषणांचाही समावेश असे. मस्तकी धारण केलेल्या शिरोभूषणांना एक सामाजिक प्रतिष्ठेचे स्थान व महत्व असलेला तो काळ होता. रेशमी भरजरी कपडयांच्या मोत्यांचे, जडजवाहिरांचे तुरे, लडी असलेल्या पगडया—जरीबुट्टीचे रूमाल, पटके, दिमाखदार टोप्याशिवाय पोषाखाला पुर्णता नव्हती. ही शिरोभूषणे किंमती असत. संपूर्ण पोषाखाच्या तुलनेत पायातील वहाण नगण्य—दुर्लक्षित होती. **'पायातील वहाण पायाताच पाहिजे'** (गौतम, २००७, पृ. १०५)२३ या म्हणीतून वहाणेची नगण्यता स्पष्ट होते. वहाणाचे स्थान आसराच्या आत प्रवेश नसणाऱ्या पाळीव कुत्र्याप्रमाणे प्रवेशद्वाराच्या उंबरठयाजवळील कोपऱ्यात असे. ही जागा सोडून घराच्या अंतर्दालनात पादत्राणांना प्रवेश बंद असे

पादत्राणाभोवती शिवाशिव व सोवळे—ओवळे यांचे कुंपण असे. चामडयाला स्पर्श करणे निषिध्द, तिथे चामडयाशीच ज्याचा रोजचा व्यवहार तो चांभार अस्पृश्यच! चांभाराने बनविलेल्या पादत्राणाच्या चामडयाचा स्पर्श चाले पण चांभाराचा स्पर्श निषिध्द!(चौधरी शिवनाथ, २०११, पृ. ५८)[२४] मनुस्मृतीचा हा सामाजिक कुप्रभाव इंग्रजी कायदयांमुळे व सामाजिक चळवळीमुळे नष्ट होण्यास मदत झाली.(सतनाम सिंह, २००९, पृ. २२७)[२५] चर्मकारांनी बनविलेल्या चपला जोडयांनी ओसरीचा कोपरा सोडला आणि स्वयंपाकघरापर्यंत त्यांनी आपले स्थान प्रस्थापित केले.

किंमत, सजावट, प्रतिष्ठा या कोणत्याच बाबतीत शिरोभूषण व पादत्राणात (फुटवेअर) गतकाळात साम्य नव्हते. शिरोभूषणे किंमती वस्त्रांनी, जरीकामांनी, जडवाहिरांनी सजवलेली असत. शिरोभूषणांवरून ते वापरणाऱ्या व्यक्तीची प्रतिष्ठा, सामाजिक स्थान, अधिकार यांचा संकेत मिळे. पण 'काप गेले व भोके राहिली' या उक्तीप्रमाणे पगडया, फेटे, टोप्या गेल्या व झुलपे वाढलेली उघडी बोडकी डोकी फक्त झाकण्याची प्रथा मागे पडून पायाचे नखही दिसू नये असे पाय बंदिस्त करण्याची प्रथा रूढ होत आहे. कधी कुणाच्या स्वप्नातही आले नसेल, असा भाव व दिमाख पाद्यभूषणांना आला आहे. कळसाची जागा पायरीने घेतली आहे.(पातकर मधुकर, १९९९, पृ. १८)[२६]

आज परिस्थिती बदलली. डोक्याचे काम शरीर करू लागले. आज शरीराच्या सामर्थ्यावर जे काम होईल ते, बुध्दिसामर्थ्यावर होईलच असे नाही. म्हणून पायांची काळजी घेणे, ते सुस्थित राखणे महत्वाचे ठरावे हे ओघानेच आले. आजकाल आबालवध्द स्त्री—पुरूषांच्या पायातील पादत्राणांकडे पाहता कच्चा माल, पादत्राण उत्पादनाची वाढती कारखानदारी, भव्य—आलीशान दुकान, जाहिराती, यावर विचारपूर्वक ओझरता दृष्टिक्षेप टाकला तरी पादत्राणांच्या/फुटवेअर विकसित विशाल दुनियेची कल्पना येईल.

## फुटवेअर उत्पादनाचे 'आधुनिक तंत्र'

गेल्या साठ वर्षात पादत्राणनिर्मिती, विक्रीमध्ये आमुलाग्र बदल घडून आलेला आहे. पादत्राण उत्पादनाने वंशपरंपरेचा मनुष्यश्रमावर आधारलेला कुटिरोद्योगाचा उंबरा ओलांडून त्याने आता विशाल यंत्रोद्योगात प्रवेश केला आहे. (पातकर मधुकर, विश्व चर्मकारांचे, पृ. ४०)[२७]

पूर्वीच्या काळात पायताण, बूट, सँडल या नावाशी चामडे हा शब्द अपरिहार्यपणे जोडला गेलेला होता. पादत्राण म्हणजे चामडे असे समीकरण होते. पण आज रबर, कापड, रेक्झिन व पी.व्ही.सी. या वस्तूंचा वापर पादत्राण उत्पादनात चामडयापेक्षा अधिक आहे. त्यामुळे पादत्राण म्हणजे चामडे हे समीकरण आज राहिलेले नाही. या वस्तूंच्या वापरामुळे पादत्राण उद्योगाने वेगळे वळण व प्रचंड गती घेतली आहे. विशेषत: १९४६ ला लागलेल्या पी.व्ही.सी. (पॉली व्हिनील क्लोराईड) या रासायनिक वस्तूच्या शोधाने व त्यापासून यंत्राने व साचांनी अकल्पित क्रांती घडवून आणली. ना जोड ना शिलाई वा चिकटविणे किंवा कटाई. गिरणीत धान्य टाकावे त्याप्रमाणे यंत्रात पी.व्ही.सी. चे दाणे एका बाजूला टाकायचे व दुस—या बाजूने काही मिनिटांच्या अवधीत अखंड पादत्राण तयार—बूट, सँडल, चप्पल—साचातून काढून घ्यायचे आणि माणसाच्या शोधक बुध्दीला अनेक धन्यवाद. विज्ञान आणि यंत्र यांनी मारलेली ही भरारी पाहून बुध्दीची शक्ती सिध्द होते. **लिओ हेंड्रिक बेकलंड** (१८६३—१९४४) यांनी लावलेल्या प्लॅस्टिकच्या शोधाने एका नव्या युगाचा पाया घातला.(कुलकर्णी सुहास, यांनी घडवलं सहस्त्रक, पृ. ४६५)[२८]

लहान—मोठया शक्तीच्या परिपूर्ण स्वयंचलित यंत्रांची जोड लाभल्याने हा धंदा पूर्वीप्रमाणे निव्वळ मनुष्यश्रमावर व कुटीरछायेत न राहता उद्योग व विशाल संकल्पनेत सामील झाला आहे. छोटयात छोटया मापापासून प्रौढांच्या मापांची, असंख्य नमुन्यांतील, वेगवेगळया ऋतुमानात, उद्योगात, शेतीत पायांना आराम, संरक्षण देणारी पादत्राणे प्रतिदिनी लाखांनी बाजारात येत आहेत. या उत्पादनात अनेक कारखाने, त्यात काम करणारे हजारो कुशल अकुशल कामगार, व्यवस्थापकीय अधिकारीवर्ग, विक्री—व्यवस्थापक, नवे नवे आकर्षक नमुने तयार करणारे कल्पक यांचा मोठा वर्ग यात गुंतला आहे. दररोज बाहेर येणाऱ्या सुबक—सुखद, आकर्षक रंगछटांतील पादत्राणांनी भारतातील कानाकोपरा गजबजला असल्याचे चित्र दिसत आहे. पादत्राणांची (फुटवेअर) स्वप्नील रंगभरी आगळीवेगळी दुनिया असेच याचे वर्णन योग्य ठरेल.

एखाद्या मनुष्य श्रमावर आधारित लहान उद्योगाने कारखादारीच्या यंत्राधिष्ठित विस्तारित दालनात प्रवेश केला की, त्याचे मूळ रूपच सर्वांगाने बदलून जाते. चामडे आणण्यापासून ते तकटणे, कापणे, जोडणे व वाहाण तयार करणे ही सर्व कामे एकहाती होत. पण याच कामांची कारखान्यांच्या विस्तृत छायेत वाटणी होते. या पध्दतीमुळे उत्पादनाच्या वेळेत बचत होते. उत्पादनाची गती वाढते. हे खरे, पण या पध्दतीमुळे माझ्या हातून ही वस्तू साकारली याचा जो आनंद व समाधान कारागिराला असते, त्याला तो पारखा राहतो. 'मी हे केले' असे सांगण्यात मनाला उभारी देणाऱ्या वृत्ती उल्हसितकरणाऱ्या अभिमानाला जीवनात एक मौलिक स्थान आहे, हेही विसरावे लागते. यांत्रिकीकरणामुळे उत्पादक व उपभोक्ता हे घटकही एकमेकांपासून दूर गेले. उत्पादित पादत्राणांवरील कंपनीच्या नावापुरते हे नवे नाते जोडले गेले. (शर्मा सतिश, १९८६, पृ.३१)[२९]

## पी.व्ही.सी. (पॉलि विनिल क्लोराईड) आणि फुटवेअर

**हर्मन स्टाउडिंजर** (१८८१—१९६५) या जर्मन रसायनशास्त्रज्ञाने पॉलिमर चा शोध लावला. (कुलकर्णी सुहास, यांनी घडवलं सहस्त्रक, पृ. ४७५)[३०] त्यामुळे पादत्राणनिर्मितीत पी.व्ही.सी. चा वापर मोठया प्रमाणात करण्यात येऊ लागला. त्यापूर्वी रबराने केलेला प्रवेश आजही टिकून आहे. जलरोधक (वॉटर प्रुफ) पादत्राणांसाठी पी.व्ही.सी. पूर्वी रबराचा वापर करीत. त्यानंतर आज सामान्यापासून असामान्यापर्यंत लोकप्रिय ठरलेल्या रबरी हवाई चपला निर्माण झाल्या. हवाई चपलानंतर चामडी पादत्राणांच्या तळव्यासाठी (सोल) रबराचा उपयोग सुरू झाला आणि त्याचबरोबर चामडी चपला, बूट, सँडल तयार करण्याच्या तंत्रात महत्वाचा बदल झाला. पादत्राणांच्या जोडकामात शिलाई व खिळयांऐवजी रबर ॲधेसिव्हचा वापर सुरू झाला. कुशलता गौण ठरून यांत्रिकीकरण वाढले. त्यामुळे आता पादत्राण उत्पादनाला चांभारच पाहिजे अशी अवस्था राहिली नाही. रबरी तळव्यांच्या (सोल) सहसा वापरामुळे

चामडी तळव्याची चप्पल दुर्मिळ झाली. इंग्रजीत फूटवेअर या शब्दाने पायांच्या संरक्षणासाठी, आच्छादनासाठी वापरल्या जाणाऱ्या सपाता, चप्पल, सँडल, बूट या सर्व प्रकारच्या वस्तूंचा जो अर्थ व्यक्त होतो. फूटवेअर या इंग्रजी शब्दाला पर्यायवाचक मराठी शब्द म्हणून पादत्राण हा शब्द यथायोग्य आहे. पायाचे हर एक प्रकारे रक्षण करणारी विविध प्रकारची वस्तू म्हणजे पादत्राण असा व्यापक अर्थ या शब्दाने व्यक्त व्हायला हवा.

मनुष्याच्या दुबळेपणावर मात करणारी, इतर कोणाही प्राण्याला बहाल न केलेली बुध्दी व वाचा मनुष्याला असल्याने तो सर्वश्रेष्ठ ठरला आहे. या बुध्दिसामर्थ्यावर तो आपल्या जीविताचे जतन, रक्षण करण्यात अग्रभागी राहिला. प्रतिकूल निसर्गशक्तींवर जीवन सुखदायी करण्याचे अनेक उपाय त्याने शोधून काढले. त्यापैकीच पादत्राण हा एक शोध. पादत्राण ही वस्तूही अशीच मनुष्याने गरजेपोटी प्रथम निर्माण केली. त्यावेळी तो एक शोधच होता. प्रदीर्घ कालखंडाच्या वाहत्या प्रवाहामुळे आजकाल पायातील वहाण ही एक य:कश्चित दुर्लक्षित वस्तू वाटत असली तरी, या प्राचीन काळात मानवी बुध्दीने ती प्रत्यक्षात आणली तो दिवस संस्कृतीच्या वाटचालीतील महत्वाचा टप्पा मानावा लागेल. निबिड अरण्यातून, आडवाटेने, डोंगरकपारींच्या चढउतारांवरून, ओबडधोबड, खडकाळ पायवाटांवरून, कधी तप्त धुळीच्या पाय पोळणाऱ्या फोफाटयातून, तर कधी थंड दलदलने पावले गारठवून टाकणाऱ्या चिखलवाटेने, जीवनासाठी भटकंती करणाऱ्या रानटी आदिमानवाला पावलांच्या संरक्षणासाठी काही आवरण असते तर, आपली ही भटकंती सुखाची होईल असे वाटणे स्वाभाविक होते. मनुष्याला सुचलेल्या या विचारात पादत्राण या संकल्पनेचे बीज आहे. या योग काटेकुटे, दगडधोंडे, उन्हाचे चटके, चिखलाचा त्रास यापासून होणारा त्रास कमी होईल व चालणे—धावणे सुखाचे व सुलभ होईल. विनात्रासाची सुखावह चाल हा पादत्राण निर्मितीमधील प्रधान हेतू होय. पादत्राणाची कल्पना सुचून पादत्राणाची निर्मिती माणसाने केली, पण नेमक्या कोणत्या काळात ही निर्मिती त्याने केली व त्याच्या वापराला सुरूवात केली याची निश्चित माहिती इतिहास आजही सांगत नाही. जे काही सांगतो ते तसे तर्क व अंदाजावर आधारलेले सांगतो. तर्क—अंदाजाच्या प्रदशोतच मनुष्य इतिहासाचा उगम आहे. त्याला पादत्राणही अपवाद कसा असेल? तरीपण उपलब्ध विविध ग्रंथांतील उल्लेखांवरून हा काळ सहस्त्र वर्षाचा आहे हे स्पष्ट होते. अथर्ववेदातील विसाव्या कांडात पादत्राणात पाय सुरक्षित राहतो असा स्पष्ट उल्लेख आढळतो. इसवीसनपूर्व तीन हजार सातशे या काळात पादत्राणांपैकी सँडल हा प्रकार वापरात होता असा निश्चित कालदर्शक उल्लेखही वाचावयास मिळतो. याचा अर्थ अति प्राचीन असलेल्या हडप्पा आणि मोहेंजदरो संस्कृती पासून इतिहासपूर्व सहस्त्रो वर्षाचा इतिहास पादत्राणाला आहे, असे अनुमान नि:संशय काढता येते. (सिंह सतनाम, २००९, पृ. ३३)[३१]

इजिप्त, ग्रीक, बाबीलोन, असिरिया व भारत या देशांतील प्राचीन समाजाला पादत्राणाचा उपयोग करणे ज्ञात होते. जोपर्यंत कातडे कमावण्याची कला मनुष्याला अज्ञात जोती, तोपर्यंत जसे वस्त्राचा शोध लागेपर्यंत वल्कले वापरीत, तसे पादत्राणांसाठी लाकडाचा उपयोग करीत. ही अतिप्राचीन परंपरा संन्याशांच्या खडावाच्या रूपात आजही जिवंत आहे. कातडयाशी जोडले गेलेले अपवित्रतेचे नाते लाकडाशी नाही, हेही त्या तशा लाकडी खडावा पण मागे पडल्या. पाण्यात वापरणे व स्वच्छ ठेवणे सोपे म्हणूनही खडावांना पसंत केले जाई. पायाच्या तळव्याच्या आकारातील फळीला पकडीसाठी अंगठयाजवळ लाकडी खुंटी जोडली की, या खडावा तयार होतात. उष्णतेने गरम किंवा थंडीने गार न होण्याचा नैसर्गिक गुणधर्म लाकडात असल्याने, खडावा वापरणे आरोग्यास उपयुक्त असते. पायांचे तळवे व डोळयांचे आरोग्य यांचा संबंध लक्षात घेता, लाकडी खडावा या अधीक चांगल्या. नुसत्या अंगठयाजवळील खुंटीला पकडून ठेवणे अवघड जाते, हे अनुभवाला येताच पकड अधिक घट्ट व सुलभ होण्यासाठी धुरीवर आडव्या पट्टीची योजना केली गेली. या विजापासून पादत्राणांचा आजचा विशाल वृक्ष वाढला. त्याला कारण घडले ते, चामडे कमावण्याची माणसाला गवसलेली किमया ! (डॉ. सुमनाक्षर सोहनपाल, २००२, पृ. ७१)[३२]

## मानवी जीवनात फुटवेअरचे महत्व : रोजगाराची संधी

मनुष्य जीवनात फुटवेअरचे अनन्य साधारण महत्व आहे. हजारोसालापासून मनुष्याचे जीवन सुखी व समृध्द करण्यात चामडयापासून बनवलेले फुटवेअर (जोडे व चपला) ही वस्तू बहुमोल सिध्द झालेली आहे. अनादी कालापासून दोन्हीत निर्माण झालेले नाते आजपर्यंत अतूटपणे टिकून आहे. मनुष्याला अनेक कारणांसाठी उपयुक्त ठरणाऱ्या वस्तूंमध्ये चामडयाचे स्थान अजोड मानावे लागेल. त्याची गुणवत्ता व उपयुक्तता यांचे स्थान घेणारी अन्य वस्तू असेल असे वाटत नाही. मानवी जीवनातील चामडयाची ही महत्ता आजवर टिकून आहे. यातच त्याची गुणवत्ता सिध्द होते. आपल्या वापरातील दैनंदिन उपयोगाच्या किती वस्तू चामडयापासून बनतात यावर ओझरता दृष्टीक्षेप टाकला तरी हा खजिना किती समृध्द आहे हे लक्षात येते. उपयुक्ततेच्या निकषावर नारळवृक्षाला ‘कल्पवृक्ष’ म्हणतात.इच्छापूर्ती करणाऱ्या गाईला ‘कामधेनू’ म्हणतात. अशाच एखाद्या अर्थपूर्ण शब्दाने चामडयाच्या उल्लेख व गौरव करावा लागेल, अशी चामडे ही बहुगुणी वस्तू आहे. (कर्दम जयप्रकाश अनु.१९९८ पृ. १५)[३३]

चामडयापासून बनविलेल्या वस्तू अनंत प्रकारच्या तर आहेतच, पण त्या तशा आकर्षक, कलात्मक व सुंदरही आहेत. मौल्यवान वस्तू ठेवण्यासाठी तयार केलेली खोगीरे, वेगवेगळया प्रकारच्या बॅगा, पैशांची पाकिटे, स्त्रियांचे बटवे, सुंदर व सुबक कपडे, शिरोभूषणे, गाद्या—गिरद्या, पाण्याच्या मोटा व पखाली, तेलांच्या व औषधांच्या बुदल्या, कमरपट्टे, गळपट्टे, लगाम, चाबूक, किती आणि किती प्रकारे! यादी म्हटली तर एक स्वतंत्र शब्दकोशच व्हावा! परंतु कातडयाऐवजी रबराचा वापर करून सपाता बनविल्या गेल्या. चामडी वस्तू देखणी होण्यासाठी त्यावर उठावाचे, तसेच रंगाचे नक्षीकाम केले जाते. इतकेच नव्हे तर, त्याचा कागद वा कापडासारखा गृहभाग म्हणून उपयोग करून रंगचित्रे रेखाटली जातात. राजप्रासाद व धनिकांच्या हवेल्या सजविण्यासाठी या चित्रांना महत्व होते. चित्राप्रमाणे चामडयावर लेखन केले जाई. चामडयाचा असा उपयोग करण्यासाठी ते कमावलेले असावे लागते. पादत्राणासाठी वापरल्या जाणाऱ्या चामडयाचा मनुष्याला किती प्रकारे उपयोग आहे याची यावरून सहज कल्पना येते.

## फुटवेअरसाठी कृत्रिम चामडयाचा पर्याय : फुटवेअरमध्ये विविध रंग व डिझाईन

नैसर्गिक चामडयासाठी जनावरांवर अवलंबून राहावे लागते. जोपर्यंत मनुष्यसंख्या व पशुसंख्या यात गरजेचा समतोल होता, तोपर्यंत पादत्राणासाठी वाजवी भावात चामडे मिळण्यात अडचण नव्हती. परंतु सतत वाढत जाणारी लोकसंख्या आणि त्याउलट सातत्याने घटत जाणारे पशुधन, यामुळे मागणी व पुरवठा यातील अंतर वाढत जाऊन ते प्रमाण व्यस्त होत गेले तसे पादत्राणाकरिता चामडे वापरणे कठीण होत गेले. चामडयाची वाढती मागणी व अपुरा पुरवठा यामुळे चामडयाचे भाव सातत्याने चढत गेले. परिणामत: नैसर्गिक चामडयाची पदत्राणेनिर्मिती घटत व महागत गेली. फुटवेअरमध्ये विविध रंग व डिझाईन आल्यात. चामडयांच्या पादत्राणांच्या किंमती सामान्य ग्राहकाच्या क्रयशक्तीबाहेर भडकल्या.

या परिस्थितीत पादत्राण (फुटवेअर) उत्पादनात रबराने पदार्पण केले आणि त्या प्रमाणात चामडयाला पर्यायी वस्तू मिळाली. त्याचप्रमाणे कृत्रिम चामडे म्हणून ओळखली जाणारी वस्तू पादत्राणात वापरली जाऊ लागली आणि याच्या जोडीला १९४६ नंतर प्लास्टिक या मूळ घटकापासून बनलेल्या पी.व्ही.सी. या रासायनिक पदार्थापासून मोठया प्रमाणावर पादत्राणे बनू लागली. पादत्राणांची प्रचंड मागणी व चामडयाच्या तुटवडयावर मात करण्यास रबर, रेक्झिन व पी.व्ही.सी. यांचा वापर उपयोगी पडला हे खरे. पण चामडयाच्या सरसपणाशी या वस्तूंची तुलना करता येणार नाही. परंतु हेही तितकेच स्पष्ट आहे की, या वस्तू निर्माण झाल्या नसत्या तर चामडयाची पादत्राणे वापरणे, हे फक्त धनिकांनाच शक्य होते. आजही चामडयाची पादत्राणे वापरणारा वर्ग हा सांपत्तिक सुस्थितीतलाच आहे.(डॉ. शिंदे सत्यदेव, २००२, पृ. ७१)[३४]

रबरी ही वस्तू नैसर्गिक आहे. मलेशिया रबर उत्पादन करणारा मोठा देश. त्याच्याशी तुलना करता भारताची उत्पादन क्षमता कमी नाही. असे असले तरी मलेशियाच्या उत्पादन खर्चापेक्षा भारताचा उत्पादन खर्च प्रतिकिलो दोन तृतीयांश जास्त आहे. मलेशियात किलोचा दर दहा रूपये आहे तर भारतात सतरा रूपये. मजुरीचा विचार केला तर भारतात मजुरी स्वस्त आहे. सुसंगत नियोजनाचा अभाव हेच याचे कारण

असू शकते. यासाठी उज्ज्वल भविष्यकाळ असलेल्या रबर उद्योगाकडे योग्य दिशेने लक्ष दिले पाहिजे असे मत 'ऑल इंडिया रबर इंडस्ट्रीज असोसिएशनने' व्यक्त केले आहे. (पातकर मधुकर, विश्व चर्मकारांचे, पृ. ४०)[३५]

रबरासारखीच पादत्राण उत्पादनात उपयोगी पडणारी महत्वाची वस्तू म्हणजे रेक्झिन अथवा कृत्रिम चामडे. याला कृत्रिम चामडे असे का म्हणायचे? तर ते नजरेला नैसर्गिक चामडयासारखे दिसते म्हणून! त्याच्या पृष्ठभागाचा पोत (टेक्स्चर) हुबेहुब चामडयाचा भास निर्माण करतो.[३६] या सारखेपणामुळे ग्राहकांची फसवणूक करणे जराही अडचणीचे होत नाही. वास्तविक कापडावर पॉलियुरेथिन या विशिष्ट लुकणाचा थर देऊन हे बनवतात. तसे पाहिले तर हे रेक्झीनच असते. या प्रकारचे हे कृत्रिम चामडे बनवणारा भोर इंडस्ट्रीज हा एकमेव कारखाना आहे. याला 'पीन्यू' असे नाव आहे.

सरकारी धोरणे कशी विसंगत व उद्योगाला मारक ठरतात ते या पीन्यूवरून स्पष्ट होते. या लुकणासाठी वापरल्या जाणाऱ्या पॉलियुरेथिन या रसायनावरील आयात शुल्क तयार पॉलियुरेथिन चामडे आयातीवरील शुल्कापेक्षा जास्त आहे. याचा प्रत्यक्ष परिणाम असा होतो की, इथे बनवलेले हे चामडे आयात केलेल्या चामडयापेक्षा महाग पडते. पैसे कमाविण्याकरिता उत्पादन करणारा कोणता उत्पादक स्वस्त मालाऐवजी महाग मालाची खरेदी करेल? पुढारी, मंत्र्यांनी घोषणा मात्र स्वयंपूर्णतेच्या करायच्या व कृती नेमकी त्याच्या उलट करायची असा हा प्रकार आहे.

## निष्कर्ष :

चर्मकार समाजाच्या फुटवेअर व्यवसायाचे विश्लेषणात्मक अध्ययन केल्यानंतर पुढील निष्कर्ष निघतात —

१. चर्मकार समाजाने सामाजिक भेदभावामुळे गाव सोडले आणि आपला पारंपारिक व्यवसाय शहरात येवून विकसित केला.
२. काळानुसार विक्रीकलेत सुधारणा केल्यात व व्यवसाय वाढविला. बेरोजगार युवकांना रोजगाराच्या संधी दिल्यात.
३. मुलांना उच्च शिक्षित केले. प्रशासनात तसेच तांत्रिक व वैद्यकीय सेवेत सहभाग वाढविला.
४. गावसोडल्यामुळे चर्मकारांचा जीवनाकडे व व्यवसायाकडे पाहण्याचा कल बदलला. ते आधुनिक बनलेत.
५. चर्मकार समाजाने फुटवेअरच्या व्यवसायातून जोडधंदे निर्माण केलेत.

## शिफारसी व उपाययोजना :

१ चर्मकार समाजाने एवढयावरच समाधानी राहू नये. उद्योगधंदे स्थापन करून आपले कौशल्य दाखवावे. २. गुंतवणूक करतांना सरकारी बॅकेतून कर्ज काढावे आणि नियमितपणे हप्ते भरावे. आपल्या विषयी विश्वास निर्माण करावा.
३ चांगल्या पध्दतीने आपल्या व्यवसायाची जाहिरात करावी.
४ समाजऋणाची जाणिव ठेवून गोरगरीबांची मदत करावी.
५ बाजार व ग्राहकांच्या आकांक्षा ओळखून फुटवेअरच्या विविध डिझाईन उपलब्ध करून द्याव्यात. [८]

## संदर्भ ग्रंथ सूची :


१. शिंदे सत्यदेव, चर्मकार, सुगावा प्रकाशन, पुणे, २००२, पृ. ३५.
२. गौतम एस. एस., चर्मकार जाति, इतिहास और संस्कृति, गौतम बुक सेन्टर, दिल्ली २०१२, पृ. ९२.
३. चंगोले पी. एस., समतावादी राजसत्तेचे पुरस्कर्ते गुरू रविदास, गुरू रविदास प्रकाशन, नागपूर, १९९७, पृ. १६.
४. आचार्य गुरूप्रसाद, चमार — वेदकालीन प्राचीन जाति, संपादक : डॉ. सोहनपाल सुमनाक्षर, भारतीय दलित साहित्य अकादमी, दिल्ली, २००० पृ. ८५.
५. कासारे एम. एल., इकॉनॉमिक फिलॉसॉफी आफ डॉ. बी. आर. आंबेडकर, बी. आय. पब्लिकेशन प्रा. लि. न्यू दिल्ली, १९९६, पृ. ७६.

६. कीर धनंजय, राजर्षी शाहू छत्रपती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९९२, पृ. १८९.
७. अनु. कर्दम जयप्रकाश, चमार, मूल लेखक : जी. बी. ब्रिग्स, १९२०, समता प्रकाशन, दिल्ली, १९९८, पृ. १४.
८. ओशो, चंदनाचे संगे तरूवर चंदन, संत रोहिदास : भाग १, शोभना मुद्रणालय, पुणे, १९८९, पृ. ३८.
९. डॉ. मुंशीलाल गौतम, बापुसाहेब राजभोज इन सर्च ऑफ बुध्दिस्ट आयडेन्टी,एसजीएसएसएसडी, अलिगड, १९८४, पृ. १८१.
१०. राजेंद्र प्रसाद, लॉ ऑफ सोशल स्टेटस, हिंद लॉ हाऊस, पुणे, १९९८, पृ. ४३२.
११. पाठक डॉ. अरूणचंद्र, महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, नागपूर जिल्हा, भाग –१, दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, २००५, पृ. ५७७.
१२. जिज्ञासू चंद्रिकाप्रसाद, भारतीय चर्मकारों व महारों की उत्पत्ति, स्थिति और जनसंख्या, बहुजन कल्याण प्रकाशन, लखनऊ, १९८४, पृ. २९.
१३. गौतम एस. एस. (संकलन एवं संपादन) भारतीय लोकोक्तियों में जातीय व्देष, गौतम बुक सेंटर, दिल्ली, २००७, पृ. १०३.
१४. बोखारे नरेंद्र, महाराष्ट्रातील चांभार समाजाचा संस्कृती परिचय, संपादन, लीला बांदिवडेकर, अविनाश सहस्त्रबुध्दे, विश्व चर्मकारांचे, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, १९८९, पृ. ९.
१५. भोसले बी. व्ही. चर्मकाराज ईन ट्रान्सिसन, नुराली प्रकाशन कंपनी, मुंबई, २००३, पृ. ६३.
१६. कीर धनंजय, महात्मा जोतीराव फुले, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २०००, पृ. ५३.
१७. कुमार कुलदीप, ऐसा चाहूं राज मै... संत सिपाही रैदास, सम्यक प्रकाशन, नई दिल्ली, २००९, पृ.१७२.
१८. साळुंखे आ. ह. मनुस्मुतीच्या समर्थकांची संस्कृती, लोकवाङ्.मय गृह, मुंबई, २००० पृ. ९९.
१९. पातकर मधुकर, कथा ही चर्मोद्योगाची, विश्व चर्मकारांचे, संपादन, लीली बांदिवडेकर, अविनाश सहस्त्रबुध्दे, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, १९९९. पृ. ५४.
२०. सुर्यवंशी कृ. गो., राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, १९८४, पृ. ९१.
२१. शर्मा सतिश कुमार, द चमार आर्टिशन्स, बी. आर. पब्लिशिंग कार्पोरेशन, न्यू दिल्ली, १९८६, पृ. ४५.
२२. साळुंखे आ. ह., मनुस्मुतीच्या समर्थकांची संस्कृती, लोकवाङ्.मय गृह, मुंबई, २००० पृ. १.
२३. पातकर मधुकर, कथा ही चर्मोद्योगाची, विश्व चर्मकारांचे, संपादन, लीली बांदिवडेकर, अविनाश सहस्त्रबुध्दे, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, १९९९, पृ. १७.
२४. सिंह कुमार उमेश, गुरू नानक देव और संत रविदास एक तुलनात्मक अध्ययन,ए. पी. एच. पब्लिशिंग कॉर्पोरेशन नई दिल्ली, २०००, पृ. ४२.
२५. चंगोले पी. एस., समतावादी राजसत्तेचे पुरस्कर्ते गुरू रविदास, गुरू रविदास प्रकाशन, नागपूर, १९९७, पृ. २३.
२६. बागडे रविन्द्र, आंबेडकरी चळवळ आणि चर्मकार समाज, विश्व चर्मकारांचे, संपादन, लीला बांदिवडेकर, अविनाश सहस्त्रबुध्दे, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, १९९९, पृ. ७७.
२७. गौतम एस. एस., भारतीय लोकोक्तिया में जातीय व्देष, गौतम बुक सेंटर, दिल्ली, २००७, पृ. १०५.
२८. चौधरी शिवनाथ 'आलम', सद्‌गुरू रविदास और डॉ. अम्बेडकर, संपादक : डॉ. रामकुमार अहिरवार, एस. एस. गौतम संत शिरोमणी गुरू रविदास विचार दर्शन, गौतम बुक सेंटर, नई दिल्ली, २०११, पृ. ५८.
२९. सिंह सतनाम, चमार जाति का गौरवशाली इतिहास, सम्यक प्रकाशन, नई दिल्ली, २००९, पृ. २२७.
३०. पातकर मधुकर, कथा ही चर्मोद्योगाची, विश्व चर्मकारांचे, संपादन, लीली बांदिवडेकर, अविनाश सहस्त्रबुध्दे, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, १९९९, पृ. १८.
३१. उपरोक्त, पृ. ४०.
३२. कुलकर्णी सुहास, चंपानेरकर मिलिंद, यांनी घडवलं सहस्त्रक, रोहन प्रकाशन, पुणे, २००३, पृ. ४६५.
३३. शर्मा सतिश कुमार, द चमार आर्टिशन्स, बी. आर. पब्लिशिंग कार्पोरेशन, न्यू दिल्ली, १९८६, पृ. ३१.
३४. कुलकर्णी सुहास, चंपानेरकर मिलिंद, यांनी घडवलं सहस्त्रक, रोहन प्रकाशन, पुणे, २००३, पृ. ४७५.
३५. सिंह सतनाम, चमार जाति का गौरवशाली इतिहास, सम्यक प्रकाशन, नई दिल्ली, २००९, पृ. ३३.
३६. G. W. Briggs, the Chamar, 1920 P. 20